ARTHA ( Commercial Weekly )
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख १३ व २० जुलै, १९६० अंक २८

## विविध माहिती

**भारताच्या मालाची प्रसिद्धि**—पश्चिम आशिया आणि भूमध्य समुद्रालगतचे देश ह्यांच्यांतील व्यापाराच्या दृष्टीनें बैरूट हें शहर महत्त्वाचें आहे. ह्या ठिकाणीं भारत सरकारच्या व्यापार व उद्योग खात्यातर्फे एक केंद्र उघडण्यांत येणार आहे. भारताच्या मालाची माहिति देऊन प्रसिद्धि करण्याचें काम केंद्राकडून करण्यांत येईल.

**तेल कारखान्यावर सरकारी ताबा**—क्यूबाच्या सरकारनें हॅवाना येथील अमेरिकन मालकीच्या तेलशुद्धीच्या कारखान्याचा ताबा घेतला आहे. ह्या कारखान्यानें रशिआंतून आयात केलेलें अशुद्ध तेल शुद्ध करण्यास नकार दिला होता. व्हेनेझुएलाकडून घेण्यांत येणारें तेल कारखाना शुद्ध करीत असे.

**ब्रिटनकडून कर्ज**—ब्रिटनकडून माल आयात करता यावा म्हणून ब्रिटननें भारताला १ कोटी पाडें कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे. १९६०–६१ सालीं भारताला भासणारी परदेशीय चलनाची टंचाई अंशतः दूर करण्यासाठी लवकर मदत देण्यांत यावी, अशी मागणी भारत सरकारकडून करण्यांत आली होती.

**जनता घड्याळांचा कारखाना**—हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या बंगलोर येथील कारखान्याला जोडून ' जनता घड्याळें ' तयार करण्याचा एक सरकारी कारखाना काढण्यांत येणार आहे. सामान्य माणसाच्या खिशाला परवडतील अशा बेतानें घड्याळाच्या किंमती ठेवण्यांत येणार आहेत.

**घरगडी पुरविण्याची व्यवस्था**—अहमदाबाद पोलिसांनीं घरकामासाठी लागणारे गडी पुरविण्याची योजना तयार केली आहे. ह्या गड्यांच्या प्रामाणिकपणाविषयीं विशेष काळजी घेण्यांत येईल. घरगडी मालकाचे पैसे व जडजवाहिर चोरून पळून गेल्याच्या अनेक तक्रारी अलीकडे पोलिसांकडे आल्या होत्या. त्यावर हा उपाय आहे.

**रेल्वेच्या नौकरांची सोय**—रेल्वेच्या नौकरांची सोय करण्यासाठी रेल्वे बोर्ड महत्त्वाच्या रेल्वे स्टेशनांवर वसतिगृहें बांधण्याचा विचार करीत आहे. ह्या वसतिगृहांत २० लोकांची जेवण्याची व राहण्याची तात्पुरती सोय करण्यांत येईल. रेल्वेच्या कामासाठी जाणाऱ्या रेल्वेच्या नौकरांची त्यामुळें सोय होणार आहे. वसतिगृहें बांधकामाच्या जुन्या सामानाचा उपयोग करून बांधण्यांत येतील.

**पाकिस्तानांत तेलाची खाण**—पाकिस्तानांतील रावळपिंडी पासून १०० मैलांवर असलेल्या एका गांवीं तेलाचा शोध लागला आहे. ह्या भागांत अलीकडे तेलाच्या संशोधनासाठी विहिरी खोदण्यांत येत आहेत. तेलाचा दर्जा उत्कृष्ट असून एका तासांत २५ पिंपे ह्या वेगानें ते उफाळत आहे.

**कोळशाच्या पुरवठ्याची तातडी**—अहमदाबादमधील ६२ कापडाच्या गिरण्यांपैकी ५७ गिरण्यांना कोळशाचा तुटवडा पडण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. शहरांतील गिरण्यांना रोज ७२ वॅगन्स कोळशाचा पुरवठा व्हावा लागतो. पण गेल्या महिन्यांत दररोज अवघ्या ३० वॅगन्सचा पुरवठा होऊं शकला. अहमदाबाद गिरणी मालकसंघानें ह्या बाबतींत कोल कमिशनरला तार केली आहे.

**औरंगाबादजवळ नवी लेणी**—औरंगाबादपासून ४२ मैलांवर असलेल्या एका गांवाजवळ नव्या लेण्या सांपडल्या आहेत. ह्या लेण्यांत अजंठा व वेरूळ येथील लेण्यांप्रमाणेंच शिल्पकृति व चित्रकृति आहेत. त्यांचा काळहि अजंठा येथील लेण्यांचाच आहे. नव्या लेण्यांना जावयाचा मार्ग अवघड असल्यानें आतां नवा रस्ता तयार करण्यांत येणार आहे.

**कानपूरच्या संस्थेला मदत**—अमेरिकेचें तांत्रिक सहकार्य मंडळ व भारत सरकार ह्यांच्यांत एक करार झाला आहे. ह्या कराराप्रमाणें कानपूर येथील इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी ह्या संस्थेला ४८·६ लाख रुपये मदतीदाखल मिळणार आहेत. पैशाचा उपयोग परदेशांत शैक्षणिक व शास्त्रीय उपकरणें घेण्यासाठी करावयाचा आहे.

**सिनेमागृहें बंद**—म्हैसूर सरकारनें धारवाड जिल्ह्यांतील सिनेमागृहांच्या परवान्यांचें नूतनीकरण करण्याचें नाकारल्यामुळें जुलैच्या प्रारंभीं सुमारें ६० सिनेमागृहें बंद ठेवण्यांत आलीं. धारवाड, बेळगांव, विजापूर व कारवार येथील सिनेमागृहांनीं पूर्वीच्या मुंबई सरकारचे थिएटरांच्या व्यवस्थेबाबतचे नियम कटाक्षानें अंमलांत आणावें असा हुकूम देण्यांत आला होता. तो न पाळला गेल्यामुळें हा प्रसंग ओढवला.

**चित्तरंजन कारखान्यांतील सोय**—चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनांच्या कारखान्यांत कारखान्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञांना शिक्षण देण्याची सोय तर आहेत; पण त्याशिवाय रेल्वेकडून आलेल्या नौकरांनाहि शिक्षण देण्याची व्यवस्था आतां करण्यांत आली आहे. कारखान्यांच्या तांत्रिक शाळेंत दरसाल १२५ विद्यार्थ्यांची सोय होऊ शकते.

**चिनीमातीच्या भांड्यांचा कारखाना**—जामनगर येथील चिनी मातीचीं भांडीं व कौलें तयार करणारा एक कारखाना लवकरच बंद पडण्याचा संभव आहे. कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्याचा हा परिणाम आहे. गेले आठ महिने उसना कोळसा घेऊन कारखाना कसाबसा चालविण्यांत आला. कारखान्यांत ६०० मजूर काम करतात.



"बाळाला
इंजिनिअर
करूं या गडे"
'नाहीं, नाहीं, डॉक्टर'...

बाळ पाळण्यांत असल्यापासूनच त्याच्या भविष्याची गोड स्वप्नें रंगविण्यांत आईबाप गुंग होऊन जातात. आपल्या मुलानें, कोणीतरी 'मोठ्ठे' व्हावे असे सहाजिकच प्रत्येक मातापित्याला वाटत असते. पण बाळाला 'मोठ्ठे' करावयाचे म्हणजे त्याच्या शिक्षणासाठीं खर्चहि मोठा करावयाला हवा. आयत्यावेळीं ही मोठी रक्कम कोठून आणणार? आयुर्विमा ही तुमची काळजी दूर करील. तुम्ही हयात असा अगर नसा आयुर्विमा तुमच्या मुलासंबंधीच्या सर्व आकांक्षा पूर्ण करील.

शक्य असेल तेवढी रक्कम आयुर्विम्यांत गुंतवा. व आपल्या मुलांचा भविष्यकाळ निश्चित करा. आजच विमा एजन्टाची गांठ घ्या.

आयुर्विम्याला दुसरा पर्याय नाहीं



**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

pratibha 60-8

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ **सरदारगृह** ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**अन्नाचें रहस्य**




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— बु. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

# अर्थ

बुधवार, ता. १३ व २० जुलै, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रोजगाराच्या दृष्टीनें ग्रामोद्योगाचें महत्त्व

बिहार राज्याच्या खादी व ग्रामोद्योग संघटनेची ४ थी वार्षिक परिषद् पाटणा येथें भरली होती. काँग्रेसचे अध्यक्ष श्री. संजीव रेड्डी हे अध्यक्षस्थानीं होते. ह्या प्रसंगीं केलेल्या आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, खादी तयार करण्याचा व्यवसाय व ग्रामोद्योग ह्यांच्या साह्यानें मोठ्या प्रमाणावर रोजगार तर उपलब्ध होऊं शकेलच, पण त्याशिवाय भारतामधील खेडीं स्वयंपूर्ण करण्याचें कामहि त्यामुळें होऊं शकेल. रूरकेला, दुर्गापूर व अशाच प्रकारच्या इतर प्रचंड कारखान्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यांत येत आहेत. परंतु तरीसुद्धां त्यांच्याद्वारां बेकारीचा प्रश्न सुटणें शक्य होणार नाहीं. ह्याचा अर्थ मोठाले उद्योगधंदे देशांत उभारण्यांत येऊ नयेत असा नाहीं. त्यांना विरोध असण्याचें कारण नाहीं. देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठीं भारी उद्योगधंदे व छोटे उद्योगधंदे ह्या दोन्ही प्रकारच्या उद्योगधंद्यांची गरज आहे, ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली गेली पाहिजे. तथापि, अजून कितीतरी शतकें छोट्या प्रमाणावरील उद्योगधंदे व ग्रामोद्योग ह्यांना देशाच्या आर्थिक जीवनांत महत्त्वाचें स्थान राहील ह्याविषयीं शंका घेण्याचें कारण नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां बिहारच्या खादी बोर्डानें गेल्या तीन वर्षांत केलेलें कार्य कौतुकास्पद आहे. खादी बोर्डानें केलेल्या कार्याचा परिणाम म्हणून बिहारमध्यें मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण झाला आहे. खादी व गिरणींत तयार होणारें कापड ह्यांच्या बाजारांतील स्पर्धेत खादीचा टिकाव लागत नाहीं म्हणून खादीच्या उद्योगाचा अशा रीतीनें विकास करण्यांत आला पाहिजे कीं खादीच्या कापडाला गिरणीच्या कापडाशीं टक्कर देतां आली पाहिजे. असें होण्यासाठी खादी स्वस्त पडली पाहिजे.

## पाकिस्तानला मिळालेली मदत

पाकिस्तानच्या सरकारला ३१ मार्च, १९६० अखेरच्या १२ महिन्यांत मिळालेल्या परदेशीय मदतीचा तपशील प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्यासंबंधीं पाकिस्तान सरकारनें एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली आहे. ह्या कालांत पाकिस्तान सरकारला परदेशांकडून २० कोटी डॉलर्स परदेशी मदत मिळाली. त्यांपैकीं बरीच मोठी मदत नेहमींप्रमाणें अमेरिकेकडून मिळालेली आहे. अमेरिकेची पाकिस्तानला मिळणारी मदत तीन प्रकारची असते. विशिष्ट विकास कार्यासाठी मिळणारी मदत, वस्तु पुरविण्याची मदत आणि तांत्रिक मदत. ह्या तिन्ही प्रकारांनीं मिळालेल्या मदतीचा आकडा आतां १६६·५ कोटी डॉलर्सपर्यंत पोंचला आहे. त्याशिवाय शेती व उद्योगधंद्यांना केलेली खास मदत वेगळी आहे. अमेरिकेशिवाय युरोपमधील कांहीं देशांनींहि पाकिस्तानला मदत करण्याविषयीं आस्था दाखविलेली आहे. पश्चिम जर्मनी व पाकिस्तान ह्यांच्यांत आर्थिक मदतीचा करार झालेला असून ब्रिटनशीं मदतीविषयीं बोलणीं चालू आहेत, अगर होतीं. त्याशिवाय इटली व जपान ह्या देशांशींहि मदतीबद्दल वाटाघाटी चालू होत्या. ह्या आर्थिक वर्षात त्यांच्याकडून उदार हातानें मदत मिळेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. बेल्जमच्या सरकारनेंहि पाकिस्तानला आर्थिक व तांत्रिक मदत देण्याची तयारी दाखविली आहे. पाकिस्तानची परदेशीय हुंडणावळीबाबतची परिस्थितीहि आतां सुधारलेली आहे. ह्या परिस्थितींत १९५८ च्या डिसेंबरपासून १९६० च्या मार्च महिन्याअखेर खूपच सुधारणा झाली. १९६० च्या मार्चअखेर सोनें, डॉलर्स व पौंड ह्यांच्यामधील शिल्लक १३२·२५ कोटी रु. झाली. १९५९ च्या मार्च अखेरपेक्षा ही शिल्लक ४१·३१ कोटी रुपयांनीं अधिक होती.

## पोलाद कारखान्यांचें संपूर्ण उत्पादन

हिंदुस्थान स्टील लि. चे अध्यक्ष श्री. जी. पांडे ह्यांनीं पत्रकारांशीं बोलतांना अशी माहिती सांगितली कीं, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत जे तीन पोलादाचे कारखाने उभारण्यांत आले आहेत त्यामधील पूर्ण उत्पादन १९६१ मध्यें सुरू होईल. ते पुढें म्हणाले कीं, पुढील वर्षाच्या फेब्रुआरी महिन्यांत भिलई येथील कारखान्यांतील सर्व घटकांत कामास प्रारंभ होईल. रुरकेला येथें जर्मनीच्या मदतीनें व दुर्गापूर येथें ब्रिटनच्या मदतीनें जो कारखाना उभारण्यांत येत आहे त्यामधील सर्व घटक १९६१ च्या मध्याच्या सुमारास प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करतील. सर्व कारखान्यांनीं आपली संपूर्ण उत्पादनक्षमता वापरावयास सुरवात केली, कीं प्रत्येक कारखाना दरसाल १० लाख टन पोलाद निर्माण करूं शकेल. भिलई येथील कारखान्याचा विस्तार करून पोलादाचें उत्पादन २५ लाख टनांपर्यंत वाढविण्यांत यावयाचें आहे. रुरकेला व दुर्गापूर येथील कारखान्यांचें उत्पादनहि २० लाख टनांपर्यंत वाढविण्यांत यावयाचें आहे. सर्वच कारखान्यांच्या विस्ताराच्या योजनांवर आतां अखेरचा विचार करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें बिहार राज्यांत बोकॅरो येथें काढण्यांत यावयाच्या पोलादाच्या चवथ्या कारखान्याबद्दल प्राथमिक स्वरूपाचें काम चालू करण्यांत आलें आहे. ह्या कारखान्यांतून तंत्रज्ञांना शिक्षण देण्याची जी व्यवस्था आहे तिची व्याप्ति वाढविण्यांत येणार आहे. प्रत्येक कारखान्यांत २,००० कुशल तंत्रज्ञ कामगार शिकवून तयार करण्यांत येतील. त्याशिवाय प्रत्येक कारखान्यांत ६० ते ९० उच्च प्रतीचे अधिकारीहि शिकवून तयार करण्यांत येतील. परदेशांच्या कारखान्यांत शिकण्यासाठी १५० एंजिनिअर्सना पाठविण्यांत येईल.

## कारागिरांना सवलतीच्या दरानें आयुधांचा पुरवठा

गतवर्षीच चालू केलेल्या एका योजनेखालीं देशांतील कांहीं समाज विकास गटांत खेड्यांतील लोहार आणि सुतार यांना यापूर्वीच १·७४ लक्ष रुपये किंमतीचीं सुधारलेलीं आयुधें पुरविण्यांत आलीं आहेत. हीं हत्यारें त्यांना सवलतीच्या दरानें दिलीं जातात. व्यक्तींना तीं अवघ्या निम्म्या किंमतींत तर सहकारी संस्थांना एक चतुर्थांश किंमतीस मिळतात. अगदीं गरीब कारागिरांना तर तीं हप्तेबंदीनें दिलीं जातात किंवा तीं खरेदी करण्यासाठी कर्जहि मिळतें. दुसऱ्या योजनेच्या अखेरीपर्यंत सुमारें ६०० विकास गटांत ही योजना चालू झालेली असेल.

## व्यवसायांत सूचना देण्याची कला

### घरीं तेंच दारीं

रोजच्या घरगुती व्यवहारांत खरें आहे, तेंच कचेरींतील कारभारालाहि लागू आहे. सूचना काटेकोरपणें पाळल्या जाव्यात अशी अपेक्षा असेल तर त्या मोजक्या शब्दांत, स्पष्ट आणि निश्चित अर्थाच्या असाव्यात. त्यांचें पालन करतांना कोणत्याहि प्रकारच्या शंकेला किंवा गैरसमजाला जागा राहतां कामा नये. याशिवाय ज्याला सूचना द्यावयाच्या त्याच्या आकलनशक्तीचा विचार करूनच त्यासंबंधीची शब्दयोजना करणें जरूरीचें असतें. शक्य तों सूचना लेखी देण्यांत याव्यात. महत्त्वाच्या सूचना तर अवश्यमेव लेखीच असाव्यात. सूचनांचा अर्थ लावण्यांत अडचण येण्याचा संभव असेल तर लेखी सूचना फारच उपयोगी.

### चुकांचें उगमस्थानच शोधावें

दिलेल्या सूचना पाळल्या गेल्या नाहींत वा त्यामुळें कांहीं अनर्थ ओढवला तर वरिष्ठ अधिकारी खालच्या नोकरांवर चुकांचें खापर फोडतांना दिसतात. पण यापुढें तरी अनर्थ टाळण्याकरितां ह्या चुकांचें उगमस्थान शोधलें जाणें इष्ट असतें. सूचनांचा कच्चा खर्डा नीट तपासलेला असला आणि सूचना देण्यापूर्वी त्यांत जरूर त्या सुधारणा केलेल्या असल्या म्हणजे त्यांचा अर्थ सुस्पष्ट होऊं शकतो आणि गैरसमजास समर्थनीय कारण उरतच नाहीं. परिस्थिति बदलत जाते, अधिक महत्त्वाच्या गोष्टी कमी महत्त्वाच्या बनतात किंवा कमी महत्त्वाच्या गोष्टींचें महत्त्व वाढतें. तेव्हां दिलेल्या सूचनांची मधून मधून तपासणी करणें श्रेयस्कर ठरतें.

### असंदिग्ध शब्दयोजना

"हुकूम सोडतां येणें ही एक कला आहे. हुकमाची शब्द-योजना इतकी असंदिग्ध असावी कीं त्याच्या अर्थाबद्दल कसलीहि शंका उपस्थित होऊं नये कीं गैरसमजाला वाव राहूं नये" असें एका तज्ज्ञानें म्हटलें आहे.

तेव्हां ह्यापुढें केव्हांहि आणि प्रत्येक वेळीं दुसऱ्याला कांहीं सांगण्याचा प्रसंग आला तर हा साधीं प्राथमिक तत्त्वें लक्षांत असूं द्यावीं म्हणजे कितीतरी अनावश्यक डोकेदुखी टळेल आणि रागवा-रागवी होणार नाहीं.

"मी कोठें अधिकारी आहें ? हुकूम सोडण्यापेक्षा हुकूम पाळण्याचीच माझ्यावर पाळी येते. तेव्हां मला हें काय सांगतां ?" असें म्हणूं नये. कारण, प्रत्येकजण कोठेंतरी कोणाचा तरी वरिष्ठ आणि कोणाचातरी कनिष्ठ असतोच; शिवाय कांहीं झालें तरी रोजच्या व्यवहारांतील आपसांतील बोलणींसुद्धां सुस्पष्टच असायला हवींत ! तेव्हां प्रत्येक शब्दाला अर्थ असतो हें लक्षांत ठेवूनच सर्वांनीं बोललेलें बरें. कांहीं लोक जबाबदारी टाळण्यासाठी मुद्दामच लेखी सूचना देण्याचें टाळतात किंवा मोघमपणें बोलतात; त्यांचें हें मतलबी वागणें निषिद्धच होय.

—श्री. वा. काळे ह्यांचा लेख
उद्यम, जुलै १९६०.

---


**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


**ब्रिटन-रशिआ व्यापार**—रशिआच्या सरकारला ब्रिटनशीं होणाऱ्या व्यापारांत वाढ करण्याची इच्छा आहे असें ब्रिटनमधील एका उद्योगपतीनें सांगितलें आहे. रशिआ ब्रिटनकडून कारखान्यांची यंत्रसामुग्री व रोजखपाच्या वस्तू ह्यांची आयात करण्यास तयार आहे. येत्या १०–१५ वर्षांत उभयता देशांतील व्यापार दुप्पट व्हावा म्हणून रशिअन सरकार उत्सुक आहे.

**धंदेवाल्यांना विनंती**—रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनीं एका प्रसंगीं बोलतांना उद्योगपतींना व धंदेवाल्यांना अशी विनंती केली कीं त्यांनीं देशाच्या पुनर्घटनेच्या कामांत सरकारशीं सहकार्य करावें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणींत चलनवृद्धीची मोठी अडचण असल्यानें त्याहि प्रश्नाचा धंदेवाल्यांनीं विचार करावा असें त्यांनीं सुचविलें.

**हेलसिंकी येथील परिषद्**—हेलसिंकी येथें चालू महिन्याच्या अखेरीस पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांची १५ दिवसांची परिषद् भरणार आहे. ह्या परिषदेंत ८२ देशांतील शास्त्रज्ञ भाग घेणार आहेत. भारतातर्फे डॉ. विक्रम आणि डॉ. रामनाथन् हे दोघे शास्त्रज्ञ हजर राहणार आहेत.

**ब्रिटिश कंपनीला कंत्राट**—दिल्ली ते कलकत्ता ह्या रेल्वे-मार्गावरील ३०० मैल लांबीच्या रस्त्याचें विद्युतीकरण करण्याचें काम लँकेशायरमधील एका ब्रिटिश कंपनीला मिळालें आहे. हें काम १२ लाख पौंडांचें आहे. भारतीय रेल्वेसाठी करावयाच्या आणखी एका मोठ्या कामाचें कंत्राट ह्याच कंपनीला पूर्वी मिळालेलें आहे.

**गिरण्यांतील कारकुनांचें वेतन**—सेंट्रल टेक्सटाइल वेज बोर्डाच्या सर्व शिफारसी अंमलांत आणण्याचा पहिला मान अहमदाबाद शहरानें मिळविला आहे. कामगारांच्या वेतनाबद्दलच्या शिफारसी पूर्वींच मान्य करण्यांत आल्या आहेत. आतां गिरण्यां-तील कारकुनांच्या वेतनाबाबतच्या शिफारसींनाहि मान्यता देण्यांत आली आहे. ७,००० कारकुनांचा त्यामुळें फायदा झाला आहे.

**जगाच्या अंताचें भविष्य**—इटलीमधील गूढवाद्यांनीं १४ जुलै रोजीं जगाचा अंत होणार आहे असें भविष्य वर्तविलें आहे. त्या दिवशीं प्रथम अणुबॉंबसचे स्फोट होतील व नंतर भूकंप व प्रचंड भरतीच्या लाटा ह्यांचें थैमान सुरू होऊन जगाचा नाश होईल असें त्यांचें भाकित आहे. फक्त कांहीं थोडे लाख लोक ह्या आपत्तींतून बचावतील असें त्यांचें म्हणणें आहे.

**क्लोरोफिलचें उत्पादन**—पश्चिम जर्मनींतील दोघा रसायन शास्त्रज्ञांनीं क्लोरोफिल हें रसायन कृत्रिमरीत्या तयार करण्याचा शोध लावला आहे. ह्या रहस्यपूर्ण रसायनामुळें वनस्पतींना हिरवा रंग येतो. हा पदार्थ कृत्रिम रीत्या तयार करण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ गेलीं कित्येक वर्षें करीत आहे. २० वर्षांच्या प्रयत्नानंतर वरील शास्त्रज्ञांना यश आलें आहे.

**पूरपीडितांची वसाहत**—गेल्या वर्षीं तापी नदीला आलेल्या पुराच्या तडाख्यानें अनेक कुटुंबें निराधार झालीं. त्यांपैकी १०८ आदिवासी कुटुंबांसाठी नवी वसाहत स्थापन करण्यांत आली आहे. आदिवासी कुटुंबांसाठी ३९६ झोपड्या बांधण्याचें ठरविण्यांत आलें होतें. त्यांपैकी २०० झोपड्या बांधून झाल्या आहेत. प्रत्येक झोपडीला सुमारें ५०० रुपये खर्च येतो.

**सूर्यशक्तीवर चालणारी मोटार**—सूर्याच्या प्रकाशाच्या साह्यानें वीज उत्पन्न करून त्या शक्तीनें चालणारी मोटार एका अमेरिकन शास्त्रज्ञानें तयार केली आहे. मोटार तासाला २० मैल वेगानें जाऊं शकते.

## दिल्ली शहराच्या विस्ताराची मोठी योजना

दिल्ली शहराच्या विस्ताराची एक मोठी योजना प्रसिद्ध करण्यांत आली आहे. सध्यांचें दिल्ली शहर हें खरोखर दोन निरनिराळ्या शहरांचें बनलेलें आहे. १७ व्या शतकांतील दिल्ली मोंगलकालीन असून नवी दिल्ली ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या कारकीर्दींत उदयास आलेली आहे. पण ह्या दोन शहरांनीं मिळून झालेल्या दिल्लीचा एक संघ घटक म्हणून विचार करतां येत नाहीं. नव्या योजनेंत त्यांचा मिलाफ घडवून आणण्याच्या दृष्टीनें विचार करण्यांत आलेला आहे. इतर अनेक शहरांप्रमाणें दिल्लींतील लोकसंख्येची वाढहि अनियंत्रित रीतीनें होत गेलेली आहे. स्वातंत्र्यापूर्वी दिल्लीची लोकसंख्या ९ लाखांच्या आसपास होती ती आतां २१ लाखांपर्यंत आली आहे. स्वातंत्र्योत्तर कालांत दिल्लींत निर्वासितांसाठी बांधण्यांत आलेल्या वसाहती आणि सरकारी नोकरांसाठी बांधलेली उपनगरें ह्यांची भर पडलेली आहे. त्याशिवाय फरिदाबाद व गाझिआबाद ह्यासारखीं औद्योगिक केंद्रेहि नव्यानें उभारण्यांत आलीं आहेत. दिल्ली शहरासाठी योजना आखतांना शहरांत असलेल्या जमिनींचा कशा प्रकारें उपयोग केला जात आहे ह्याचा आढावा घेणें जरूर आहे. राहण्याची जागा, व्यापारासाठी वापरली जाणारी जागा, कारखान्याची जागा, सरकारी उपयोगाची जागा, मनोरंजनासाठी जागा, अशी विविध वर्गवारी योजनेंत करण्यांत आलेली आहे. १९८१ सालापर्यंतचा काल लक्षांत घेऊन योजना तयार करण्यांत आली आहे. त्या सुमारास दिल्लीची लोकसंख्या ४० लाखांच्या आसपास जाईल असा अंदाज करण्यांत आला आहे. दिल्ली शहराप्रमाणेंच ज्या शहरांची वाढ अस्ताव्यस्त झालेली आहे. त्यांनाहि दिल्ली शहराची ही योजनाविषयक पहाणी उपयोगी पडण्यासारखी आहे.

---

## रशिआकडून तेलाच्या आयातीची शक्यता

रशिआकडून पेट्रोल व तज्जन्य पदार्थ ह्यांची आयात करण्यासंबंधी प्रत्यक्ष करार झाल्याची वार्ता आहे. रशिआकडून मुख्यत: डिझेल तेल आणि रॉकेल ह्यांची आयात करण्यांत येणार आहे. भारताला जरूर लागेल तेव्हां अशुद्ध तेल पुरविण्याची तयारीहि रशिआनें दाखविली आहे. परंतु अशुद्ध तेलाची आयात होण्याची सध्यां तरी शक्यता नाहीं. कारण, हें तेल शुद्ध करण्यासाठी तेलशुद्धीच्या भारतामधील परदेशीय कारखान्यांकडे धावें लागेल. रशिअन तेलाचा वापर करण्यास ह्या कारखान्यांनीं विशेष इच्छा दाखविलेली नाहीं. तरीसुद्धां रशिआकडून अशुद्ध तेल आयात करून त्याचें शुद्धीकरण करण्याची शक्यता अजमावण्यास सरकार मात्र उत्सुक आहे. असें केल्यानें परदेशीय चलनाची बरीच बचत सरकारला करतां येईल. रशिआ तेलाची किंमत रुपयांत घेण्यास तयार आहे. अलीकडे रशिआकडून अविकसित देशांना मिळणारी आर्थिक मदत वाढूं लागलेली आहे. पश्चिम युरोप व अमेरिका ह्यांच्या तेलाच्या व्यापारालाहि रशिआच्या स्पर्धेची झळ लागूं लागलेली आहे. क्यूबा येथील सरकारनें राज्यांतील परदेशीय कारखान्यांना रशिअन तेल शुद्ध करण्याचें सुचविलें त्यांनीं ह्या गोष्टीस विरोध केला. त्याबरोबर क्यूबाच्या सरकारनें ते कारखानेच आपल्या ताब्यांत घेतले. अर्धविकसित अगर अविकसित देशांना प्रगत देशांची मदत घेतल्याखेरीज औद्योगिक विकास करणें कठीण जाते. अशी मदत मिळविण्याच्या व घेण्याच्या कामीं राजकारण आडवें येऊं लागल्यास त्यांची पंचाईत होईल.

## पंचवार्षिक कार्यक्रमांत स्फोटकांचा उपयोग

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी मालकीच्या व सार्वजनिक मालकीच्या विभागांत मिळून ७,२०० कोटी रुपये खर्च व्हावयाचे आहेत. ह्या रकमेपैकी निम्मी रक्कम अशा उद्योगधंद्यांवर व विकासकार्यावर खर्च होणार आहे कीं ज्यांत स्फोटक द्रव्यांचा उपयोग करावा लागतो. उदा. खाणी, पाटबंधाऱ्यांचीं कामें, वाहतूक. अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांतून १० लाख लोकांना रोजगार मिळण्याची संधि प्राप्त होणार आहे. स्फोटक द्रव्यांचा उपयोग करण्यांत खाणीचा धंदा हा अर्थातच पहिल्या क्रमांकाचा आहे. १९६१–१९६६ ह्या कालांत स्फोटक द्रव्यांचा उपयोग चौपट वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या अवधींत स्फोटक द्रव्यांच्या साह्यानें कोळशाच्या वार्षिक उत्पादनांत २ ते २॥ पट वाढ होईल. चुनखडी व लोखंडाचें खनिज ह्यांच्या उत्पादनांत ६ ते ७ पट वाढ होईल. कोळशाच्या खाणींच्या खालोखाल चुनखडीच्या खाणींत स्फोटकांचा उपयोग करण्यांत येतो. त्याच्या खालोखाल लोखंडाच्या खाणींत स्फोटक लागतात. त्याशिवाय सोनें, तांबें, अभ्रक, बॉक्साइट व मँगेनीज ह्यांच्या खाणींतहि स्फोटकें लागतातच. १९५६ सालीं सर्व प्रकारच्या खाणींत मिळून ३,९०० टन स्फोटकांचा उपयोग करण्यांत आला. १९६० सालीं सुमारें ८,००० टन स्फोटकांचा उपयोग करावा लागेल असें दिसतें. पहिला पंचवार्षिक कार्यक्रम अंमलांत येऊं लागल्यापासून स्फोटकांना आणखी एक नवें क्षेत्र उपलब्ध झालें. राज्यसरकारें आपआपल्या भागांत जीं नवीं धरणें बांधूं लागलीं त्यासाठीहि स्फोटकांची जरूरी भासूं लागली.

---

## रासायनिक खताच्या कारखान्यांची प्रगति

हिंदुस्थान केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि. ह्या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बी. सी. मुखर्जी ह्यांनीं भारतांत काढण्यांत येणाऱ्या रासायनिक खताच्या कारखान्यांच्या प्रगतीची माहिती दिली आहे. 'सार्वजनिक मालकीच्या विभागाचें कार्य' ह्या विषयावर ते बोलत होते. आजच्या भाषणांत ते म्हणाले, कीं, नांगल येथें काढण्यांत येत असलेला खताचा कारखाना आतां पूर्ण होत आला आहे. बहुधा चालू वर्षाच्या अखेरीला तो प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल. ह्या कारखान्यांतून दरसाल २०,००० टन नत्रयुक्त खताची निर्मिति करण्यांत येईल. चालू वर्षाच्या अखेरीच्या सुमारास भाक्रा येथील जलविद्युत् केंद्राकडून विजेचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर होऊं लागेल असा अंदाज आहे. अर्थातच कारखान्यासाठी लागणाऱ्या विजेबद्दल चिंता करण्याचें कारण उरणार नाहीं. रूरकेला आणि नेवेली येथें काढण्यांत येत असलेले खताचे कारखाने अनुक्रमें १९६२ व १९६३ सालीं चालू होतील अशी अपेक्षा आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील हे तीन कारखाने सोडून मुंबईजवळ ट्रॉम्बे येथें काढण्यांत येत असलेल्या कारखान्याचे प्राथमिक काम बऱ्याच प्रमाणांत झालें आहे. ह्या कारखान्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची मागणी बहुधा चालू वर्षाच्या अखेरीस नोंदण्यांत येईल आणि १९६३ सालच्या अखेरीस कारखाना चालू होईल. आसाममध्यें आणखी एक खताचा कारखाना उभारण्याचें काम हिंदुस्थान केमिकल्सकडे सोंपविण्यांत आलें आहे. बरौनी व गोहाटी येथील तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी अशुद्ध तेलाचें उत्पादन सुरू झालें म्हणजे नैसर्गिक वायूचा उपयोग करून हा कारखाना काढण्यांत येणार आहे.

**खेड्यांना विजेचा पुरवठा**—आंध्रांतील खेड्यांना विजेचा पुरवठा करण्यासाठी राज्याच्या वीजबोर्डानें ३ कोटी रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. ग्रामीण वीजपुरवठ्याच्या बाबतींत आंध्र प्रदेश शेजारच्या इतर राज्यांच्या मानानें मागें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस राज्यांतील २०,००० खेड्यांपैकी फक्त ३,००० खेड्यांना विजेचा पुरवठा होऊं लागेल.

**कॅनडांत बेकायदा प्रवेश**—कॅनडांत बेकायदा प्रवेशाची व्यवस्था करणारी चीनच्या नागरिकांची एक ग्रुप संघटना आढळून आली आहे. कॅनडांत सर्वत्र पसरलेल्या ह्या संघटनेचा पोलिसांनीं नुकताच शोध लावला आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर सुमारें ११,००० चिनी नागरिक बेकायदेशीर रीत्या कॅनडांत गेले आहेत.

**इस्पितळाला पुराचा तडाखा**—सौराष्ट्रांत अतिवृष्टीमुळें झालेल्या पुराचा तडाखा राजकोट नजिकच्या क्षयरोगाच्या इस्पितळाला बसला आहे. इस्पितळच्या इमारतीचे २·५ लाख रुपयांचें नुकसान झालें असून इस्पितळ तूर्त बंद करण्यांत आलें आहे. ह्या इस्पितळांतील १७२ रोग्यांची दुसरीकडे सोय करावी लागली.

**तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची जी रूपरेषा प्रसिद्ध करण्यांत आली आहे तीबद्दल ब्रिटनच्या सरकारी गोटाला व धंदेवाल्यांना आश्चर्य वाटत नाहीं. ह्या कार्यक्रमांतील कांहीं भाग 'इकॉनॉमिस्ट' ह्या नियतकालिकानें गेल्या मार्चमध्यें प्रसिद्ध केला होता. त्यावरून त्याच्या व्याप्तीची कल्पना लोकांना आली होती.

**जगाचा नाश समीप नाहीं**—इटलीमधील कांहीं गूढवाद्यांनीं १४ जुलैला जगाचा नाश होणार असल्याचें भविष्य केलें होतें. परंतु पं. रमेशचंद्र ह्या विख्यात ज्योतिषानें असें कांहीं होणार नसल्याचें मत व्यक्त केलें. मात्र १९६२ पर्यंत व नंतर १२ वर्षे जगांतील लोकांना दुष्काळ, पूर, भूकंप, रोगराई व बेबंदशाही ह्यांना तोंड द्यावें लागेल असा त्यांचा होरा आहे.

**वनस्पति तेलाचें उत्पादन**—जगांत उत्पादन करण्यांत येणाऱ्या वनस्पती तेलाच्या उत्पादनापैकी २३ टक्के उत्पादन १९५९ सालीं कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांनीं केलें असा अंदाज करण्यांत आला आहे. १९५९ सालीं एकूण १ कोटी, ५९ लाख टन वनस्पती तेलाचें उत्पादन झालें. १९५८ सालापेक्षा हें उत्पादन ७ टक्क्यांनीं अधिक आहे.

**मध्यप्रदेशांत वैद्यकीय कॉलेज**—मध्यप्रदेश सरकारनें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रायपूर येथें एक मेडिकल कॉलेज स्थापन करण्याचें ठरविलें आहे. रायपूर येथें एक व रेवा येथें एक मेडिकल कॉलेज उघडण्यांत यावें अशी शिफारस राज्यसरकारनें नियोजन समितीला केली होती. राज्यसरकारनें अखेर रायपूर अधिक पसंत केलें.

**संस्कृत कॉलेजसाठी मदत**—जबलपूर विद्यापीठाशीं संलग्न असें एक संस्कृत कॉलेज जबलपूर येथें काढण्याची खटपट चालू आहे. कॉलेजसाठी मध्यप्रदेश सरकारकडून रु. ३०,००० ग्रँट म्हणून मागण्यांत आली आहे. इमारतीसाठी रु. ५०,००० ची एक जागा ह्या योजनेच्या प्रवर्तकांनीं मिळविली आहे. आणखी कांहीं मदतीचीं आश्वासनें मिळालीं आहेत.

**आसाममधील तेलाचा साठा**—आसाम राज्यांतील तेल खाणीच्या भागांत सुमारें २·९ कोटी टन अशुद्ध तेलाचा साठा आहे असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या भूमिगत तेलाचा उपसा करण्याचें काम ऑइल इंडिआ लि. ही कंपनी करणार आहे. ही कंपनी आसाम ऑइल कंपनी व भारत सरकार ह्यांच्या भागिदारींत आहे.

**रशिआ-इंडोनेशिआ करार**—रशिआ व इंडोनेशिआ ह्यांच्यांत ३ वर्षे मुदतीचा व्यापारी करार करण्यांत आला आहे. ह्या करारास अनुसरून इंडोनेशिआ रशिआकडून विविध प्रकारची यंत्रसामुग्री घेणार असून रशिआला रबर, वनस्पती तेल, मसाल्याचे पदार्थ, इत्यादि प्रकारचा कच्चा माल पुरविणार आहे.

**कापसाचा सहकारी कारखाना**— शेवगांव तालुक्यांतील कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनीं कापसांतील सरकी काढून त्याचे गठ्ठे बांधण्याचा एक मोठा कारखाना स्थापन करण्याचें ठरविलें आहे. हा कारखाना सहकारी तत्त्वावर चालविण्याचा त्यांचा विचार आहे. कारखाना शेवगांव येथें काढण्यांत यावयाचा असून त्यासाठी १० लाख रुपये भांडवल लागेल.

**शेतकी विद्यापीठाचा प्रारंभ**— अमेरिकेंतील लँड ग्रँट कॉलेजच्या धर्तीवर काढण्यांत आलेल्या भारतामधील पहिल्याच शेतकी विद्यापीठाच्या कामास प्रारंभ झाला आहे. हें विद्यापीठ उत्तर प्रदेशाच्या तराई विभागांत काढण्यांत आलें असून तें पूर्णपणें ग्रामीण भागांत वसलेलें आहे. कॉलेजसाठी अमेरिकेकडून मदत मिळालेली आहे.


शेड्यूल्ड बँक **दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.** स्थापना : १९३५

**—: भांडवल :—**

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | रु. ३१,००,००० |
| गंगाजळी व इतर निधी | ... | रु. १४,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. १५ कोटींचे वर |

आपण बचत केलेले पैसे महाराष्ट्र बँकेंत गुंतविल्यास योग्य व्याज मिळून राज्यांतील लहान उद्योगधंद्यांना त्यांतून कांहीं प्रमाणांत भांडवली मदत करण्याचें श्रेय आपणांस मिळूं शकेल.

—विशेष माहिती मुख्य कचेरी वा बँकेच्या शाखा यांत मिळूं शकेल.—

मुख्य कचेरी
बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा कच्चा मसुदा

राष्ट्रीय उत्पन्नांत पांच टक्क्यांनीं वाढ करण्याचें उद्दिष्ट नजरेपुढें ठेवून नियोजनमंडळानें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा कच्चा मसुदा प्रसिद्ध केला. त्यांत एकूण १०,२०० कोटि रुपयांच्या भांडवल गुंतवणुकीपैकी सरकारी क्षेत्रांतील गुंतवणूक ६,२०० कोटी रुपयांची व खाजगी क्षेत्रांतील गुंतवणूक ४,००० कोटि रुपयांची राहील. सरकारी गुंतवणुकीपैकी २०० कोटि रुपयांची रक्कम खाजगी क्षेत्राला भांडवल म्हणून कर्जरूपानें दिली जाईल.

दर दिवसाला दरडोई १५ औंस कडधान्यें, ३ औंस डाळी व दर वर्षाला १७·५ वार कापड आणि ६ ते ११ वर्षें वयाच्या सर्व मुलामुलींना सक्तीचें मोफत शिक्षण अशी तरतूद या योजनेंत करण्यांत आली आहे.

सरकारी क्षेत्रांतील भांडवलापैकी ३,६५० कोटि रुपयांचा भाग राज्य-सरकारांचा राहील. केंद्र-सरकारकडून राज्य-सरकारांना २,५०० कोटि रुपयांची मदत मिळेल.

ठरलेल्या कार्यक्रमानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी २६०० कोटि रुपयांची परकीय मदत मिळवावी लागेल. अर्थात् दुसऱ्या योजनेसाठी घेतलेल्या कर्जाच्या फेडीच्या हप्त्यांचा यांत समावेश आहे.

### जादा कराची तयारी हवी

१०,२०० कोटि रुपयांच्या एकूण भांडवलांत पोलाद-कारखाने, घरबांधणी, वगैरेसाठी आर्थिक तरतूद आहे. तसेच आर्थिक क्षेत्रांत चलनवाढीची वृत्ति असल्यानें अंदाजपत्रकांतील तूट ५५० कोटि रुपयांपेक्षा जास्त असूं नये असें बंधन घालण्याची सूचना या योजनेंत करण्यांत आली आहे.

शेतीव्यवसायांत ३५ लक्ष लोकांना व कारखान्यांत १॥ कोटि लोकांना कामधंदा मिळवून देण्याचें उद्दिष्ट या योजनेंत आहे.

### योजनेचीं पांच ठळक उद्दिष्टें

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासांत तृतीय पंचवार्षिक योजना हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. या योजनेचीं उद्दिष्टें पुढीलप्रमाणें आहेत :—

(१) येत्या पांच वर्षांत राष्ट्रीय उत्पन्नांत दरसाल ५ टक्क्यांनी वाढ घडवून आणणें. पुढील योजनेंतहि हा वेग टिकावा या दृष्टीनें भांडवल गुंतवणूक.

(२) अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्णता गाठणें, आणि उद्योगधंद्यांची व निर्यातीची गरज लक्षांत घेऊन शेतकी उत्पादनांत वाढ करणें.

(३) पोलाद, इंधन व विद्युत् या मूलभूत उद्योगधंद्यांची वाढ करणें आणि देशाच्या साधनसंपत्तींतूनच येत्या १० वर्षांत देशाचें औद्योगिकरण करतां यावें यासाठी यंत्रसामुग्री तयार करणारे कारखाने उभारणें.

(४) देशांतील मनुष्यबळाचा पुरेपूर उपयोग करून घेणें आणि रोजगाराच्या संधींत पुरेशी वाढ होईल या दृष्टीनें प्रयत्न करणें.

(५) उत्पन्न व संपत्ति यांमधील विषमता कमी करणें आणि आर्थिक सत्तेचें अधिक प्रमाणशीर विकेंद्रीकरण करणें.

### लोकसंख्येची समस्या

नुकत्याच केलेल्या अनुमानावरून देशाची लोकसंख्या सन १९६६ मध्यें ४३ कोटि, ४० लक्ष होणार होती परंतु ती ४८ कोटींवर जाण्याचा संभव दिसत आहे. उत्पन्न वै खप यांचें प्रमाण ज्या अर्थव्यवस्थेंत अत्यंत कमी आहे तेथें लोकसंख्येच्या भरमसाट वाढीमुळें आर्थिक विकासाला बराच प्रतिबंध होतो. लोकसंख्या कायम पातळीवर ठेवणें त्यामुळें आवश्यक आहे. लोकसंख्यावाढीच्या वेगामुळें आर्थिक विकासाचा वेगहि वाढविण्याची निकड तितकीच उत्पन्न होते.

योजनेंतील सरकारी क्षेत्रांत शेतकी व समाजविकास यांसाठी १०२५ कोटि रु. ची आणि मध्यम व मोठमोठ्या पाटबंधाऱ्यांच्या योजनांसाठी ६५० कोटि रु. ची तरतूद आहे. खासगी क्षेत्रांतर्फे सुमारें ८०० कोटि रु. ची गुंतवणूक होण्याचा संभव आहे. (सरकारी क्षेत्रांकडून होणारी मदत वगळून). योजनेच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यानंतर जर असें आढळून आलें कीं, मनुष्यबळाचा पूर्ण उपयोग करून ग्रामीण अर्थव्यवस्थेची जलद प्रगति घडवून आणण्यासाठी अधिक पैशांची तरतूद करण्याची आवश्यकता आहे, तर अशी तरतूद केली जाईल.

### परकीय चलन

दुसऱ्या योजनेच्या अखेरीस भारताच्या अर्थव्यवस्थेंत राष्ट्रीय उत्पन्नाच्या ११ टक्के रक्कम गुंतविली जाईल. हें प्रमाण तिसऱ्या योजनेच्या अखेरीस १४ टक्क्यांवर नेण्याचें उद्दिष्ट तिसऱ्या योजनेंत पुढें ठेवलेलें आहे. तसेंच सध्यां बचतीचें प्रमाण एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८ टक्के पडतें त्यांत वाढ होऊन तिसऱ्या योजनेच्या अखेरीस तें ११ टक्क्यांवर जावें असें उद्दिष्ट आहे.

पहिल्या दोन योजनांच्या प्रारंभीं परकीय चलनाची जी परिस्थिति होती त्यापेक्षा ही योजना सुरू होतांना निराळी परिस्थिति आहे. परकीय चलनाच्या शिलकीची पातळी फारच खाली गेल्यानें आतां त्यामधून उचल करणें कठीण आहे. तसेंच दुसऱ्या योजनेच्या सुरुवातीला असलेल्या किंमतीपेक्षा चालू किंमती सुमारें २० टक्क्यांनीं जास्त आहेत. या दोन गोष्टींचा विचार करतां, चलनफुगवट्याची परिस्थिति निर्माण होण्याचा संभव असलेला खर्च सरकारी क्षेत्रांत कमींत कमी केला पाहिजे.

तिसऱ्या योजनेंत झपाट्यानें औद्योगीकरण करण्यावर भर देण्यांत आला असल्याकारणानें परकीय चलनहि मोठ्या प्रमाणावर खर्चावें लागेल. या योजनेंत प्रत्यक्ष परकीय चलनाचा खर्च सुमारें १९०० कोटि रुपये होईल. याखेरीज देशांतील भांडवली मालाचें उत्पादन वाढविण्यासाठी लागणारे सुटे भाग वगैरेंच्या आयातीसाठी आणखी सुमारें २०० कोटि रुपयांची तरतूद करावी लागेल. म्हणजे तिसऱ्या योजनेसाठी एकंदर २१०० कोटि रुपयांच्या परकीय चलनाची गरज भासेल.

या योजनेंत आपल्याला एकूण २६०० कोटि रु. चें परकीय चलन लागेल. यांत अमेरिकेकडून पी. एल्. ४८० नुसार मिळणाऱ्या वस्तुरूपानें होणाऱ्या साहाय्यापासून येणाऱ्या ६०० कोटि रुपये उत्पन्नांची भर करावी लागेल.

दुसऱ्या योजनेच्या काळांत, सरकारी क्षेत्रांतील कारखान्यांचें व इतर योजनांचें बांधकाम चालू होतें तर तिसऱ्या योजनेंत त्यामध्यें उत्पादन होऊं लागेल व फायदा होऊं लागेल. हें जें वाढतें उत्पन्न मिळणार आहे, त्याचा विनियोग अधिक किंवा जादा गुंतवणुकीसाठी करण्यांत येईल आणि तसा तो आला पाहिजे.

### तिसऱ्या योजनेच्या खर्चाची उभारणी

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सरकारी क्षेत्रांतील खर्चासाठी पैसा कोठून व कसा उपलब्ध होईल तें पुढील तक्त्यांत दिलें आहे.

(आकडे कोटि रुपयांचे.)

| | दुसरी योजना | तिसरी योजना |
|---|---|---|
| १. शेतकी | ६७५ | ८५० |
| २. वीज | ४० | ५० |
| ३. वाहतूक | १३५ | २०० |
| ४. ग्रामोद्योग व छोटे उद्योगधंदे | २२५ | ३२५ |
| ५. मोठें व मध्यम उद्योगधंदे आणि खाणिजें | ७०० | १०५० |
| ६. घरबांधणी व इतर बांधकाम योजना | १००० | ११२५ |
| ७. इन्व्हेण्टरीज | ५२५ | ६०० |
| एकूण | ३३०० | ४२०० |

जादा कर-आकारणीमधून पांच वर्षांत १६५० कोटि रुपये उभारण्याचें संकल्पित लक्ष्य गाठण्यास या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्व आहे. भारतांतील कराचें उत्पन्न आज राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८·५ टक्के आहे. कराच्या उत्पन्नांत सर्वसामान्यपणें होणारी वाढ व तिसऱ्या योजनेंतील करयोजना यांमुळें हें प्रमाण तिसऱ्या योजनेंत ११ टक्क्यांवर जाईल.

तिसऱ्या योजनेंत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांत वाढ करावी लागेल. तसेंच, सरकारी उद्योगधंद्यांतूनहि अधिक शिल्लक येण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. प्राप्ति आणि कॉर्पोरेशन करांच्या उत्पन्नांत वाढ होण्यासाठी करविषयक कारभारव्यवस्था अधिक कडक करून, कंपन्यांच्या खर्चाची नीट पाहणी करून व त्यांवर खास लक्ष ठेवून करचुकवाचुकवींचे अन्य प्रकार होऊं नये म्हणून उपाययोजना करावी लागेल. अप्रत्यक्ष कर आणि सरकारी क्षेत्रांतील मालाच्या किंमतींत होणारी वाढ यांमुळें किमती कांहींशा वाढतील, परंतु देशासाठी करावयाच्या त्यागाचा हा एक भाग आहे.

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | दुसरी योजना | व तिसरी योजना |
|---|---|---|
| १. करआकारणीच्या सध्यांच्या पद्धतीनुसार महसुली शिल्लक | (–) १०० | ३५० |
| २. सध्यांच्या पद्धतीप्रमाणें रेल्वेकडून मिळणारी रक्कम | १५० | १५० |
| ३. सध्याच्या प्रमाणांत सरकारी उद्योगधंद्यांतून होणारा नफा. | — | ४४० |
| ४. कर्जे उभारून | ८०० | ५५० |
| ५. अल्पबचत योजना | ३८० | ५५० |
| ६. प्रॉव्हिडंट फंड, बेटरमेण्ट लेव्हीज स्टील, इक्विलायझेशन फंड व इतर किरकोळ बाबींतून जमा होणारें उत्पन्न | २१३ | ५१० |
| ७. जादा करआकारणी (यांमध्यें सरकारी उद्योगधंद्यांचा नफा वाढण्यासाठी योजलेले उपाय अंतर्भूत आहेत) | १००० | १६५० |
| ८. परदेशांकडून मिळणारें अंदाजी साह्य | ९८२ | २२०० |
| ९. तुटीची अर्थव्यवस्था | ११७५ | ५५० |
| एकूण | ४६०० | ७२५० |

## दुरुस्त वारसा कर कायद्याचा अंमल जारी

वारसा कर (दुरुस्ती) कायदा, १९५८ आणि वारसा कर (दुरुस्ती) कायदा, १९६० हे कायदे १ जुलै १९६० पासून अंमलांत येत आहेत.

सन १९५८ च्या दुरुस्त कायद्यानें १९५३ च्या वारसा कायद्यांतील तरतुदींत कांहीं महत्त्वाचे फेरबदल केले आहेत. सदर दुरुस्त कायद्यान्वयें सर्वसाधारण सुटीची मर्यादा एक लक्ष रु. वरून कमी करून पन्नास हजार रु. वर आणण्यांत आली असून, खालील टप्प्यांच्या बाबतींत कराचे दरहि किंचित् कमी करण्यांत आले आहेत. मिताक्षर, मरूमाकाट्टायम आणि अलियासंतान या कायद्याच्या प्रणालीनुसार चालणाऱ्या अविभक्त हिंदु कुटुंबांतील मृत घटकांच्या बाबतींत सदर दुरुस्त कायद्यांत कर आकारणीचा दर ठरविण्याच्या दृष्टीनें संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेंतील मृत माणसाचा केवळ हिस्साच नव्हे तर त्याच्या वंशपरंपरागत वारसदारांच्या हितसंबंधांचा विचार व्हावा अशी तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणें प्रत्यक्ष करासंबंधीच्या इतर कायद्यांतल्याप्रमाणेंच या बाबतची आकारणी आणि अपील करण्याच्या पद्धति ठरविल्या आहेत.

सुटीची मर्यादा आणि कराचे दर, तसेंच कराच्या दृष्टीनें मृत भागीदाराच्या वंशपरंपरागत वारसदारांच्या हितसंबंधांबाबतच्या नव्या तरतुदी, १ जुलै १९६० रोजीं किंवा त्यानंतर मृत्यु आलेल्या प्रकरणींच लागू होतील. करआकारणी आणि अपिलें यासंबंधींच्या दुरुस्त पद्धति मृत्युदिनांकाचा विचार न करतां त्याच म्हणजे १ जुलै १९६० पासून अंमलांत येतील. मात्र १९५३ च्या वारसा कर कायद्यांतील ६३ व्या कलमान्वयें मध्यवर्ती महसूल मंडळाकडे गेलेलें व अनिर्णित असलेलें अपील किंवा कंट्रोलर यांनीं १ जुलै १९६० पूर्वी काढलेल्या कोणत्याहि हुकुमाच्या बाबतींत अपील केल्यानें प्राप्त झालेला अधिकार यांच्या बाबतींत १९५३ च्या वारसा कर कायद्यांतील तरतुदी चालू राहण्याचा खास अधिकार राहील.

तसेंच १९५३ च्या वारसा कर कायद्यांतील दुरुस्त तरतुदी संबंधित राज्यांतील शेतजमिनीच्या बाबतींतहि लागू करण्यासंबंधी राज्य विधानसभांनीं संमत केलेल्या ठरावांनीं अंमलबजावणी करतां यावी म्हणून भारतीय राज्य घटनेच्या २५२ व्या कलमाखालीं १९६० चा हा दुरुस्त कायदा संमत करण्यांत आला. जम्मू व काश्मीर, ओरिसा आणि पश्चिम बंगाल हीं राज्यें वगळून इतर सर्व राज्यांतील शेतजमिनीवरहि वारसा कर आकारणीस या तरतुदी लागू होतील असें सदर कायद्यानें स्पष्ट करण्यांत आलें आहे. तसेंच ओरिसा राज्यांतील आणि १९५६ च्या बिहार व पश्चिम बंगाल (प्रदेशांचा बदल) कायद्यान्वयें पश्चिम बंगालला मिळालेल्या विभागांतील शेतजमिनींवर वारसा कराची आकारणी करण्यासंबंधांत १९५३ चा वारसा कर कायदा १ एप्रिल १९५९ पासून लागू नाहीं असेंहि पुढें या कायद्यांत स्पष्टीकरण दिलेलें आहे.

भारताच्या गॅझेटच्या ११ जून १९६० रोजीं प्रसिद्ध झालेल्या अंकांत छापून आलेल्या ३० मे १९६० च्या एका नोटिफिकेशनद्वारें १९५८ च्या वारसा कर (दुरुस्त) कायदा अंमलांत आला. सदर कायद्यांतील १ (२) कलमांतील तरतुदीनुसार या नोटिफिकेशननें १९६० चा वारसा कर (दुरुस्त) कायदा १ जुलै १९६० पासून आपोआपच अंमलांत येत आहे.

## तुटीचा अर्थसंकल्प आणि चलनवृद्धि

असोसिएटेड सिमेंट कंपनीजचे मॅनेजिंग डायरेक्टर व सेवानिवृत्त आय. सी. एस्., श्री. एन्. दांडेकर ह्यांनीं बंगलोर येथें बोलतांना भारताच्या आर्थिक परिस्थितीविषयीं कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. फोरम ऑफ फ्री एंटरप्राइज् ह्या संघटनेतर्फें घेण्यांत आलेल्या सभेंत ते भाषण करीत होते. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, चालू वर्षांत तुटीच्या अर्थसंकल्पाचें जें धोरण अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे तें सोडून देण्यांत आलें तर देशांतील पैशाचा पुरवठा आणि उत्पादन ह्यांच्यांत कांहीं प्रमाणांत समतोलता निर्माण होईल आणि आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या मार्गास लागेल. सध्यां जी चलनवाढीची लाट आलेली आहे ती थोपवून धरावयाची असल्यास तुटीच्या अर्थसंकल्पाचा त्याग केला गेला पाहिजे. पण सध्यांची परिस्थिति जराशी विचित्र आहे. वास्तविक चलनवृद्धि हा खरा रोग आहे. त्यावर उपाय न करतां रोगाच्या लक्षणावरच उपाय करण्यांत येत आहेत. रोगाच्या लक्षणांनाच रोग समजण्याचे लोकांना सांगण्यांत येत आहे. देशाजवळ असलेल्या साधनसंपत्तीविषयीं फाजील आशावाद दाखविण्यांत येत आहे. वस्तूंच्या किंमतींत जी सर्वसामान्य वाढ झालेली आहे तीवरून आणि राहणीच्या निर्देशांकावरून चलनवृद्धि झालेली आहे ही गोष्ट निश्चितपणें सांगतां येत आहे. ज्या लोकांची प्राप्ति ठराविक आहे, त्यांच्यावर चलनवृद्धीचा वाईट परिणाम होतो. शिवाय दुसराहि एक महत्त्वाचा परिणाम होतो. गुंतविलेल्या पैशाची किंमत चलनवृद्धीनें होणाऱ्या महागाईमुळें कमी होत जाते. अर्थातच पैशाची बचत करून ते गुंतविण्याची लोकांची प्रवृत्ति कमी होत जाते. त्यांतच पैसा वांचविण्याची इच्छा व शक्ति हींहि कमी आहेत.

---

## पावणे तीन टक्के दराच्या १९६० च्या कर्जाची परतफेड

सन १९६० च्या पावणे तीन टक्के दराच्या कर्जापैकी उरलेल्या कर्जांची परतफेड करण्याचा दिनांक १५ जुलै, १९६० असून सदर रकमेवर त्या दिनांकापासून व्याज मिळणार नाहीं. या दिवशीं कर्जाची परतफेड करणें सुलभ जावें म्हणून, हे कर्जरोखे असलेल्यांनीं पब्लिक डेट ऑफिस, ट्रेझरी अथवा स्टेट बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ म्हैसूर यांची शाखा यांपैकी ज्या कचेरीचें नांव असेल किंवा तें व्याजासाठी नोंदलें असतील तेथें ८ जुलै १९६० रोजीं वा त्यानंतर सादर करावेत. या रोख्यांची रक्कम परत मिळण्याबाबतच्या पद्धतीचा संपूर्ण तपशिल वर उल्लेखिलेल्या कोठल्याहि कचेरीकडे अर्ज केल्यानंतर मिळूं शकेल.

## सर्व हिंदी व्यापारी बँकांचीं देणीं व जिंदगी

( आकडे कोटी रु. चे )

| वर्ष अखेर | डिमांड ठेवी १ | टाइम ठेवी २ | एकूण ठेवी ३ | कॅश ४ | (४)चे (३) शीं प्रमाण% ५ | एकूण कर्जें ६ | (६)चें (३) शीं प्रमाण% ७ | सरकारी रोखे ८ | इतर गुंतवणूक ९ | एकूण गुंतवणूक १० | (१०)चें (३) शीं प्रमाण% ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५५ | ५९७·० | ४४६·८ | १०४३·८ | १०६·४ | १०·२ | ६३१·६ | ६०·५ | ४०७·७ | ३५·९ | ४४३·६ | ४२·५ |
| १९५६ | ६२९·३ | ४९५·८ | ११२५·१ | ९६·५ | ८·६ | ७८७·५ | ७०·० | ३८९·७ | ३७·२ | ४२६·९ | ३७·९ |
| | (+३२·३) | (+४९·०) | (+८१·३) | (−९·९) | | (+१५५·९) | | (−१८·०) | (+१·३) | (−१६·७) | |
| १९५७ | ६७४·० | ६७२·७ | १३४६·६ | १११·५ | ८·३ | ८५३·६ | ६३·४ | ४४६·२ | ५५·१ | ५०१·३ | ३७·२ |
| | (+४४·७) | (+१७६·९) | (+२२१·५) | (+१५·०) | | (+६६·१) | | (+५६·५) | (+१७·९) | (+७४·४) | |
| १९५८ | ६६४·० | ८९८·३ | १५६२·२ | १२२·९ | ७·९ | ८६०·९ | ५५·१ | ६४८·५ | ५९·२ | ७०७·६ | ४५·३ |
| | (−१०·०) | (+२२५·६) | (+२१५·६) | (+११·४) | | (+७·३) | | (+२०२·३) | (+४·१) | (+२०६·३) | |
| १९५९ | ६८३·० | ११३२·५ | १८१५·५ | ११७·५ | ६·५ | ९५२·५ | ५२·५ | ७९८·५ | ७२·८ | ८७१·३ | ४८·० |
| | (+१९·०) | (+२३४·२) | (+२५३·३) | (−५·४) | | (+९१·६) | | (+१५०·०) | (+१३·६) | (+१६३·७) | |

## हिंदी बँकांचें वसूल भांडवल, रिझर्व्ह व ठेवी

( आंकडे कोटी रुपयांचे )

| वसूल भांडवल व रिझर्व्ह | माहिती देणाऱ्या बँका | | | एकूण वसूल भांडवल व रिझर्व्ह | | | ठेवी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९५७ | १९५८ | १९५९ | १९५७ | १९५८ | १९५९ | १९५७ | १९५८ | १९५९ |
| १. ५०,००० रु. खालीं | ७ | ४ | ४ | — | — | — | — | — | — |
| २. ५०,००० ते १ लक्ष रु. | ८२ | ७८ | ७० | ०·६ | ०·५ | ०·५ | २·० | १·९ | १·८ |
| ३. १ लक्ष ते ५ लक्ष रु. | १७३ | १६७ | १५५ | ३·५ | ३·७ | ३·३ | १९·२ | २१·० | २१·१ |
| ४. ५ लक्ष ते ५० लक्ष रु. | १०१ | ८९ | ८९ | १३·१ | १२·० | १२·१ | ११०·३ | ११४·७ | १४२·० |
| ५. ५० लक्ष रु. चे वर | २९ | ३१ | २९ | ५६·९ | ६०·१ | ५९·५ | १०७२·३ | १२९२·७ | १४९९·४ |
| एकूण | ३९२ | ३६९ | ३४७ | ७४·१ | ७६·३ | ७५·४ | १२०३·८ | १४३०·३ | १६६४·३ |

### महाराष्ट्राचें १९६०–६१ चें अंदाजपत्रक

गेल्या मार्च महिन्यांत मुंबई विधिमंडळापुढें सादर करण्यांत आलेलें १९६०–६१ चें अंदाजपत्रक हें संयुक्त मुंबई राज्यासाठी होतें. फेरअंदाज हे मे १९६० ते मार्च १९६१ पर्यंतचे असून गुजरात राज्याशीं संबंधित असलेले अंदाज यांतून वगळण्यांत आले आहेत. १९६०–६१ सालच्या अंदाजांत १६ *लक्ष* रुपयांची तूट दिसून येते, ती येणेंप्रमाणें :—

| | | | कोटी रुपयांत |
|---|---|---|---|
| महसुली उत्पन्न | ... | ... | १००·९७ |
| महसुली खर्च | ... | ... | १०१·१३ |
| | | तूट | ०·१६ |

मध्यवर्ती सरकारनें गोळा केलेल्या करांपैकी या राज्याच्या वांटयास आलेल्या निधीमधून ६·०२ कोटी रुपयांची रक्कम मुंबई पुनर्रचना कायद्याच्या ४५ (२) कलमानुसार गुजरात राज्याला द्यावी लागेल. याव्यतिरिक्त सध्यां विधानमंडळासमोर मांडण्यांत आलेल्या अंदाजांत गुजरात राज्याच्या १९६० च्या एप्रिल महिन्याच्या उत्पन्नाचा व खर्चाचा समावेश झाला आहे. सरकारी नोकरांना एप्रिल महिन्यासाठी मेमध्यें देण्यांत येणारे पगार व भत्ते हे एप्रिल महिन्यांतच देण्यांत आले. या दोनतीन गोष्टींमुळें राज्याच्या महसुली परिस्थितीवर परिणाम झालेला आहे.

चालू वर्षाचा भांडवली खर्चाचा अंदाज ५९ कोटी रुपयांचा आहे. यांत राज्य सडक निधींतून (स्टेट रोड फंड) खर्च केलेली रक्कम व राज्य सरकारनें कर्जे व आगाऊ रकमा यांसाठी मंजूर केलेली खर्चाची रक्कम यांचा समावेश होतो. या खर्चापैकी १३ कोटी रुपयांचें आर्थिक साहाय्य अल्पबचत निधींतील राज्याच्या हिश्श्यांतून देण्यांत येईल व १८·३० कोटी रुपयांची खर्चाची रक्कम भारत सरकारनें दिलेल्या कर्जातून व रिझर्व बँक ऑफ इंडिया आदि संस्थांमार्फत मिळालेल्या कर्जातून भागवितां येईल. अदमासें १३ कोटी रुपये मुंबई राज्य सडक निधि, दुधनिधि, राज्य प्रॉव्हिडंट फंड, राज्य सरकारनें वसूल केलेलीं कर्जे व आगाऊ रकमा व राज्य सरकारचें इतर भांडवली उत्पन्न, यांतून देण्यांत येईल. उरलेली रक्कम ही खुल्या बाजारांत कर्जे उभारून व राखीव निधींतून रकमा काढून उपलब्ध करावी लागेल.

---

### दि फलटण बँक लि., फलटण

दि फलटण बँक लि. ला १९५९ मध्यें २५,३३० रु. चें उत्पन्न होऊन निव्वळ नफा ८,८३७ रु. झाला आहे; म्हणजे १९५८ चे मानानें उत्पन्नांत ५,५६५ रु. ची व नफ्यांत २,४८३ रु. ची वाढ झाली आहे. बँकेचे व्यवहार वाढत्या प्रमाणावर आहेत. नफ्यांतून १,७६८ रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करून आणि ३,९२१ रु. ची इनकमटॅक्सची तरतूद करून ५३% (करास पात्र) दरानें डिव्हिडंड देण्यासाठी ३,१४७ रु. चा विनियोग केला जाईल; कापलेल्या कराची रक्कम ९९१ रु. होईल. बँकेनें जनता सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांची खास बचतीची आकर्षक योजना सुरू केली आहे.

( चेअरमन : श्री. माणिकचंद मलुकचंद दोशी, बी. ए., एलएल. बी., वकील. मॅनेजर : श्री. रघुनाथ अनंत तांबे. )

---

### स्वदेशी पोर्टेबल टाइपरायटर

मेसर्स ब्लॅकवुड्स इंडिया लि. नें पोर्टेबल टाइपरायटर्सच्या उत्पादनास प्रारंभ केला आहे. कंपनीचा कारखाना कलकत्ता येथें उभारण्यांत आला आहे. कंपनीच्या पोर्टेबल टाइपरायटर्समध्यें सध्यां ९% भाग विदेशी आहेत. दरसाल १२,००० यंत्रें निर्माण करण्याची कंपनीच्या कारखान्याची उत्पादनक्षमता आहे.


स्थापना १९३६

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९५९ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,८८,५२,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,१५,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | १·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



**दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष

मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष

रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष

एकूण ठेवी : रु. १२ कोटी

खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड

मॅनेजिंग डायरेक्टर.

**ओरिसांतील आदिवासी विद्यार्थी**— ओरिसा सरकारनें राज्यांतील आदिवासी जमातींच्या विद्यार्थ्यांच्या हितसंवर्धनासाठी एक योजना आंखली आहे. ह्या योजनेवर सरकार १० लाख रुपये खर्च करणार आहे. आदिवासी विद्यार्थ्यांकरतां शहरांतून वसतिगृहें बांधणें व सेवाश्रम काढणें हीं कामें योजनेंत करण्यांत येतील. ओरिसांत २० लाख आदिवासी असून त्यांच्या ६२ जमाती आहेत.

**अणु किरणांचा वनस्पतींवर परिणाम**—अणु किरणांचा वनस्पतींवर व बीं-बियाणांवर काय परिणाम होतो त्याचा अभ्यास करण्यासाठी मुंबईमध्यें एक बाग तयार करण्यांत येणार आहे. बागेंतील वनस्पतींवर किरणोत्सर्जाचा काय परिणाम होतो त्याचा खास अभ्यास करण्यांत येणार आहे. अशा प्रकारची पहिली प्रायोगिक बाग दिल्ली येथें स्थापन करण्यांत आलेली आहे.

**पाकिस्तानांतून फळांची आयात**—भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत नुकत्याच झालेल्या व्यापारी कराराप्रमाणें भारत पाकिस्तानकडून ४० लाख रुपयांचीं फळें आयात करणार आहे. ह्या सर्व किंमतीचीं फळें आयात करण्यासाठी भारत सरकारकडून जरूर ते परवाने मिळविण्याची विनंती पाकिस्तानच्या व्यापाऱ्यांनीं आपल्या सरकारला केली आहे.

**भारतामधील दुसरी अणुभट्टी**—ट्रॉम्बे येथें उभारण्यांत आलेल्या भारतामधील दुसऱ्या अणुभट्टीची ज्वलनक्रिया नुकतीच सुरू करण्यांत आली. ही अणुभट्टी हिंदी शास्त्रज्ञांनीं व तंत्रज्ञांनीं कॅनडाच्या साह्यानें उभारली असून तीसाठी सुमारें १० कोटी रुपये खर्च आला आहे. अणुभट्टी ज्या पोलादी घुमटांत उभारण्यांत आली आहे, त्याचा व्यास १२० फूट व उंची १३४ फूट आहे.

**जपानची आयात-निर्यात बँक**—जपान सरकारच्या व्यापार-खात्यानें एक्सपोर्ट-इंपोर्ट बँक ऑफ जपानचें भांडवल ३,००० कोटी येन्सनीं वाढविण्याचा विचार चालविला आहे. अपुरा विकास झालेल्या देशांना अधिक मदत देतां यावी असा उद्देश ह्या उपक्रमामागें आहे. सध्यां बँकेचें भांडवल ४,५८० कोटी येन आहे. जपानकडून मिळणाऱ्या कर्जाऊ रकमेचा उपयोग पाकिस्तान करून घेणार आहे.

**ब्रिटनकडून अग्निबाणांची खरेदी ?**— अमेरिकेकडून 'स्कायबोल्ट' जातीचे १०० अग्निबाण खरेदी करण्याचा ब्रिटिश सरकार विचार करीत आहे. प्रत्येक अग्निबाणाची किंमत २,५०,००० पौंड असेल. हे अग्निबाण विमानांतून सोडण्याचे असून ते तयार करण्याच्या कामीं ब्रिटन अमेरिकेशीं सहकार्य करीत आहे.

**हिंदी व्यापाऱ्यांना इषारा**—इंडोनेशिआंत कापडाचा व्यापार करणाऱ्या भारतीय व्यापाऱ्यांनीं कापडाची साठेबाजी केल्याची इंडोनेशिआच्या सरकारची तक्रार आहे. हिंदी व्यापाऱ्यांना सरकारचे नियम पाळावयाचे नसतील तर त्यांनीं देश सोडून जावें; इंडोनेशिआच्या आर्थिक जीवनांत अडथळे निर्माण करूं नयेत असा इषारा त्यांना देण्यांत आला आहे.

**ब्रिटनचें पाकिस्तानला कर्ज**— पाकिस्तानच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत म्हणून ब्रिटननें ५० लाख पौंड कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. ह्या कर्जापैकी बराच मोठा भाग तागाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी वापरण्यांत येणार आहे. त्याशिवाय कांहीं प्रमाणांत कापड गिरण्यांची यंत्रसामुग्रीहि खरेदी करण्यांत येईल.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

अधिकृत भांडवल ... रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १५,००,०००
वसूल भांडवल ... रु. ११,५०,०००

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस :
४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

## Co-operative Training College, Poona.

**Results of the Examination for the Higher Diploma in Co-operation held in April 1960.**

**First Class**

J. G. Modh, P. G. Thakkar, D. M. Mehta, V. S. Pradhan, M. S. Dharap.

**Second Class**

A. A. Katharia, S. M. Patil, B. G. Doshi, L. K. Deshpande, K. R. Gadkari, C. S. Rathod, B. A. Chaudhri, M. N. Kulkarni, D. J. Shah, Manmohan Singh, K. N. Deo, P. J. Rijwani, B. K. More, S. N. Vaidya, G. D. Upasani, M. K. Sadhu, C. R. Joshi, H. K. Mahale, V. K. Kulkarni, R. T. Dhandade, R. B. Kulkarni, K. H. Karajgikar, B. Gupta, V. N. Pandya, D. N. Kalwit, A. H. More, S. G. Pathak, Kazi Bashiruddin, J. N. Najpande, D. N. Kharche, H. S. Dhole, H. V. Jani, S. N. Deshpande, D. G. Misalkar, W. Y. Dhage, A. S. Joag, M. K. Andhare, B. R. Napate, D. D. Bhatt, M. V. Joshi, M. M. Lanzewar, G. B. Jagirdar, U. E. Sabley.

**Pass Class**

D. M. Mahurkar, Kumari M. J. Otia, K. S. Pandya, P. N. Pande, V. M. Deshpande, M. R. Bambawale, M. M. Mahajan, R. S. Thorat, P. G. Houzwala, R. H. Kothalikar, N.V. Patil, S. R. Kale, M. D. Patil J. A. Patel, B. V. Lonare, A. K. Farooqui, P. D. Pawar.

**Pass with Exemption**

K. H. Baxi, H. M. Pathan.

(With exemption in Book-keeping and Accountancy and Advanced Accountancy and Auditing).

**Repeater**

P. B. Jatkar.

(With exemption in Agricultural Economics and Elements of Agriculture)

**Prizes**

| Name of Donor | Amount of Prize Rs. | To whom awarded |
|---|---|---|
| Bombay State Co-operative Bank Ltd. | 100/- | J. G. Modh. Highest No. of Marks (410 out 650) |
| Bombay State Industrial Co-operative Association. | 50/- | G. D. Upasani. Highest No. of marks in optional subject of Industrial Co-operation (62 out of 100) |

P. M. Chengappa,
Principal.

### सारस्वत को. बँकेची प्रगति

नेहमींच्या आणि आवश्यक त्या तरतुदी करून, सारस्वत को. बँकेस ३० जून, १९६० असेर संपलेल्या वर्षी १,१०,७८९ रु. निव्वळ नफा झाला आहे; गेल्या वर्षी तो १,०३,२७२ रु. होता. ठेवींची रक्कम २ कोटि, ४ लक्ष रु. ची २ कोटि, ३२ लक्ष रु. झाली आहे. वाढलेल्या भांडवलावर म्हणजे ८,५८,९९० रु. त्या भांडवलावर ६½% करमाफ डिव्हिडंडची कमिटीनें शिफारस केली आहे. एकूण गंगाजळींत आतां ९,७३,६०० रु. असून कॅश व गुंतवणूक ह्यांत १८३ लक्ष रु. आहेत.

---

**सहलीच्या ठिकाणचा विकास**— हैद्राबादपासून १४ मैलांवर हिमायतसागर तलाव आहे. हें ठिकाण सहली करणारांना फार प्रिय आहे. ह्या ठिकाणीं असलेल्या इमारतीला भारताचे भूतपूर्व अन्नमंत्री राफि अहमद किडवाई ह्यांचें नांव देण्यांत आलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत हें ठिकाण अधिक रम्य करण्याचें आंध्र सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठी ६ लाख रुपये खर्च करण्यांत येईल.

**अग्निबाणांतील प्राणी परतले**—रशिअन शास्त्रज्ञांनीं दोन कुत्रीं व एक ससा असे प्राणी बसवून एक अग्निबाण आकाशांत सोडला. हा अग्निबाण १३० मैल उंचावर गेला व त्यानंतर त्यामधील प्राण्यांना परत पृथ्वीवर आणण्यांत आलें. जमिनीवर आल्यावर ते पूर्णपणें निरोगी आढळले. माणसाच्या अंतरिक्ष प्रवासाच्या दृष्टीनें ही घटना महत्त्वाची मानण्यांत येत आहे.

---

**फक्त पुणें सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या सभासदांकरितां**

## सूचना

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची विशेष साधारण सभा मंगळवार दिनांक २६ जुलै, १९६० रोजीं दुपारीं २ वाजतां बँकेचे मुख्य कचेरींतील सभागृहांत भरणार आहे.

सदर सभेमध्यें खालील कामें करण्यांत येतील :—

(१) पोटनियमांत सुचविलेल्या खालील दुरुस्त्यांचा विचार करणें.

बँकेचे पोटनियम नं. ५, २७ (अ), २९ (२) व ३३ मध्यें मा. संचालक मंडळानें मान्य करून सुचविलेल्या दुरुस्त्या. (मसुदा सोबत जोडला आहे.)

(२) मा. अध्यक्षांचे परवानगीनें ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

सदर सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

संचालक मंडळाचे हुकमावरून,

पुणें २.
दि. १-७-१९६०

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक.


## THE DECCAN INSTITUTE OF COMMERCE.

*717, Budhwar Peth, Poona 2.* *Phone No. 2360*

**BANKERS PRACTICAL TRAINING COURSE.**

Admission to Bank-employees and Persons desirous of taking up Banking Career.

Duration—3 months. Time—7 to 8 p.m. Fees — Rs. 35 only. Limited admission.

(Date of Commencement :— 1st August, 1960.)


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.